# मराठी

( अनिवार्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 300 |
|---|---|

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

# MARATHI

**( Compulsory )**

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 300 |
|---|---|

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* भारतातील स्वास्थ्य स्थिती

*(b)* भारतातील शेतकरी कायद्याचे महत्त्व, 2020

*(c)* राष्ट्रीय शैक्षणिक धारणासमोरील आव्हाने, 2020

*(d)* कृत्रिम बुद्धिमत्तेचा वर्तमानातील उपयोग

2. पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा : 12×5=60

जीवन आणि पर्यावरणाचा एकमेकांशी खोलवर संबंध आहे. निसर्गाच्या अधिपत्याखाली माणसाची वैविध्यपूर्ण जीवनशैली असल्यामुळे, आपले मन, शरीर रचना आणि शक्तिसामर्थ्याचे विशेष गुणधर्म पर्यावरणामुळे संपूर्णपणे विकसित आणि संवर्धित होत असते. खरेतर, जीवन आणि पर्यावरणाचा अनुबंध हा एकमेकांवर आधारित, संलग्न व अत्यावश्यक आहे.

पर्यावरण हे आपले सुरक्षाकवच असून नैसर्गिक शक्तिकडून मानवी जीवनाच्या संवर्धनासाठी मिळालेली ती भेट आहे. पर्यावरण निसर्गाने दिलेली देणगी आहे. ही भूमी, जंगल-डोंगर, नदी-नाले, रंगी बिरंगी पशुपक्षी, हिरवी रानमाळं, वाळवंट आणि झुळझुळणाऱ्या झऱ्यांनी संपन्न अशी आहे. या धरितीवरील वाहणारे मंद, सुगंध शीतल वारे तसेच पावसाच्या पाण्याने अमृतवर्षाव करणारे ढग हे सर्व या पृथ्वीवरील मानव प्राण्यासाठी सुख-समृद्धी आणि समतोल पर्यावरणाची निर्मिती करतात. परंतु निसर्गाचा समतोल वेगाने ढासळत असल्याचे दिसत आहे. आणि आश्चर्यकारक बाब म्हणजे मानवाला मिळालेली ही नैसर्गिक देणगी त्याच्या बेफाम सदोष वागण्याच्या अस्ताव्यस्ततेमुळे, आंधळेपणामुळे मानवालाच हानिकारक ठरते आहे. संपूर्ण पर्यावरणाची संरचना अविवेकी मानवी वर्तनाने बिघडत आहे, त्यामूळे आता ते दिवस दूर नाहीत की, हजारो वर्षापूर्वी ज्याप्रमाणे हिमनग, बर्फाळ पर्वत आणि प्रलयंकारी समूद्राच्या लाटा, वन-पर्वत, शहरं तसेच जीवजंतुंच्या ऱ्हासाची अवस्था दृश्यमान होऊ शकेल.

www.mpscmaterial.com

निश्चितपणाने निसर्गाचे विकारी व दोषपूर्ण गढूळलेले स्वरूप समाजातील विषारी घटकांमूळे निर्माण होत आहे. आपण निसर्गाचे संतुलन बिघडवत आहोत. या असंतुलनामुळे जमीन, वायु, पाणी आणि ध्वनीचे प्रदुषण निर्माण होत आहे. नैसर्गिक प्रदुषणांमूळे फुफ्फुसाचे रोग, हृदयरोग, पोटाचे विकार, दृष्टि आणि श्रवण कमजोरी, मानसिक तणाव आणि इतर तणाव संबंधित रोग निर्माण होत आहेत. आपण सर्वजण जाणतो की नैसर्गिक संतुलनामुळेच मानवी जीवनाचे अस्तित्त्व



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

आहे. धरिती वनस्पतींनी आच्छादली जाऊ नये म्हणून गवत भक्षण करणाऱ्या पशुंचे अस्तित्व दिसते. गवत भक्षण करणाऱ्या पशुंचे योग्य संतुलन राहावे म्हणून हिंस्य प्राणीही आढळतात. या गोष्टींचे संतुलन व नियंत्रण गरजेचेच आहे. आधुनिक युगात वैज्ञानिक प्रगती आणि उद्योगधंद्यामुळे विकास आणि प्रसरण होत असतांनाच लोकसंख्येचाही भयंकर विस्फोट झालेला दिसतो.

*(a)* 'जीवन आणि निसर्ग' यांचा एकमेकांशी सखोल असणारा अनुबंध स्पष्ट करा. 12

*(b)* पर्यावरण आणि निसर्गातील नातेसंबंध उलगडून दाखवा. 12

*(c)* निसर्गाचा समतोल पर्यावरणाने कसा साधला जातो? 12

*(d)* पर्यावरणाच्या असंतुलनाने कोणती हानी होत आहे? 12

*(e)* पर्यावरणाच्या प्रदुषणातून कोणात्या व्याधींची निर्मिती होत आहे? 12

**3.** खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा : 60

भारतीय 'एकता आणि स्वातंत्र्य' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जर आमच्या 'एकतेला' धक्का पोहोचत असेल तर 'स्वातंत्र्य' देखील दरवाज्याला धडक देऊन बाहेर पडेल. त्यामूळे संपूर्ण भारतीयांचे प्रथम कर्तव्य हे आहे की त्यांनी प्राणपणाने आपल्या 'राष्ट्रीय एकतेचे' संरक्षण केले पाहिजे. राष्ट्रीय समस्या ही भाषिक समस्यांपेक्षा मोठी आहे. राष्ट्रीय एकतेच्या संरक्षण समर्थनार्थ जर आपल्याला अपमान सहन करावा लागला तरी तो आपण सहन केला पाहिजे. एकतेसाठी आपल्याला अन्याय सहन करावा लागला तर आपण अन्यायही सहन करावा, कारण जर भारताची एकता सक्षम व बलवंत झाली तर आपला अपमान कोणीही करु शकणार नाही. तेव्हा देशातील एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशावर अन्याय करण्याचे विसरुन जाईल. आपली आर्थिक स्थिती सक्षम झाल्यास आपली भांडणेही समाप्त होतील आणि भांडणे राहिली तरी त्यामध्ये पूर्वीसारखी कटूता राहाणार नाही. कारण 'संपन्नता' माणसाच्या विचाराला प्रभावशाली बनवित असते.

एकतेसोबत आपले हे देखील कर्तव्य आहे की भारताला आपण विकसित करण्यासाठी प्रयत्नरत राहिले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्याला ७३ वर्ष पूर्ण झालीत, परंतु अजूनही आपल्याला विकास पादाक्रांत करावयाचा आहे. 'स्वातंत्र्य' हा 'भाकरी' चा पर्याय होऊ शकत नाही. स्वातंत्र्य म्हणजे निव्वळ कारखान्यांची निर्मिती नव्हे, स्वातंत्र्याचा नेमका अर्थ म्हणजे



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

आत्मोन्नती आणि मानवमुक्ती होय जी अभिव्यक्तिचे पावित्र्य जोपासू शकेल. उपाशी माणसाला निव्वळ तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून उपयोग नसतो.

भारत हा काही नव्याने निर्माण झालेला देश नाही. ज्या भाषेमुळे संस्कृतीचा विकास झाला ती विश्वातील प्राचीन भाषा आहे. जो ग्रंथ भारताच्या संस्कारांचे लक्षण मानले जाते तो संपूर्ण मानवतेचा प्राचीन ग्रंथ आहे. अनेक परकीय आक्रमणांनंतरही भारतीय संस्कृती ठामपणाने उभी आहे. नवीन औद्योगिक आणि वैज्ञानिक प्रगती देखील भारताचे गतकाळातील प्रेमाचे संदर्भ हिरावून घेऊ शकत नाही. सत्य फक्त हेच नाही जे फक्त अडीचशे वर्षापासूनचे आमच्यासमोर ठेवले जात आहे. तर सहा हजार वर्षापूर्वीचे सत्यतेचे अंश देखील खूप महत्त्वाचे आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. भारताला ते मौलिक सत्यदेखील पाहिजे की समृद्धि निर्माण करण्यासाठी प्राचीन काळातील सत्याचा उपयोग कसा करावा यासाठी विचार झाला पाहिजे. निव्वळ भौतिक समृद्धी ही 'स्व' च्या अभिव्यक्तिचे हनन आहे.

जेव्हापासून संपूर्ण विश्वात वैज्ञानिकतेचा उदय झालेला दिसतो तेव्हापासून जुनी मूल्ये आणि आधुनिकतेमध्ये विजय पराजय यापद्धतीचा संघर्ष आढळून येतो आहे. केवळ भारतामध्येच गतकाळ आधुनिकतेसोबत युद्ध करतांना दिसत आहे. हा संघर्ष भारतात मोठ्या कालावधीपासून सुरु आहे. परंतु भारताचा गतकाळ आजदेखील अपर्याप्त किंवा शक्तिहीन दिसत नाही. भारतातील हे जुने संदर्भ वतर्मानाला सोबत घेऊन भविष्याकडे प्रवास करीत आहेत. आजही आपल्या आपल्या मार्गावरून भारताचा प्रवास सुरु आहे. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, टिळक, अरविंद हे सगळे महापुरुष प्राचीन काळखंडाच्या पक्षांचे समर्थन करणारे होते. या महापुरुषांनी वर्तमानाला पादाक्रांत करीत भविष्याकडे प्रयाण करण्याची शिकुवणुक दिली. महात्मा गांधी हे तर गतकाळ संस्कृती संवर्धनाचा महत्त्वाचा आवाज होते. आचार्य विनोबा भावे देखील परंपरागत आलंबनातून वर्तमान ते भविष्याकडे पाहाणारे होते. रविंद्रनाथ टागोर आधुनिकतेसोबत प्राचीनतेचे पुरस्कर्ते होते. अजूनही आम्ही प्राचीनतेला सोडलेले नाही कारण तो आमचा मुख्य प्रवाह आहे. *(एकूण शब्द 419)*

www.mpscmaterial.com

**4.** पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

जीवनातील हे एक महत्त्वाचे सत्य आहे की, चालतांना तुम्ही 'सावध' नसलात, तर तुमचा पाय चिखल किंवा खड्ड्यात पडू शकतो. वैज्ञानिक प्रवासाच्या संदर्भात देखील हेच सत्यकथन करावे लागेल. जर विज्ञानाचा उपयोग मानव कल्याण आणि विकासासाठी केला तर विज्ञान हे वरदान ठरते. त्याची उपयुक्तता कोणीही नाकारू शकत नाही. परंतु विज्ञानाचा उपयोग विध्वंसक बार्बीसाठी केल्यास विज्ञान विनाशाचे कारण बनतो, त्यामुळे त्याला शाप संबोधावे लागते. या विनाशकारी रुपामुळेच विज्ञानाने भलेही आम्हाला भौतिक सुख-सुविधा मिळवूण दिल्या असतील परंतु विज्ञानानेच आमची मानसिक सुख-शांती हिरावून घेतली आहे, असे दिसते. भौतिक प्रगतीमुळे मानवी जीवन अतिशय व्यस्त, यांत्रिकी आणि भौतिकवादी बनले आहे. खरे तर विज्ञान आणि त्याच्या उपयोगितेने माणसाला आत्मिक सुख शांतीपासून वंचित ठेवले



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

आहे. नैतिक मुल्ये आणि मानवी संबंधांचा त्यामुळे ऱ्हास झाला आहे. तथापि यामध्ये दोष माणसाचाच आहे की ज्याने विज्ञानाच्या अंगिकारातून स्वतःला अतिशय संकटात टाकलेले आहे. मोठ-मोठी संहारक शस्त्रे याबाबतीतील पुरावे आहेत.

मानवाने जर स्वतःच्या स्वार्थाला तिलांजली देऊन लोकहितासाठी विज्ञानाच्या प्रवाहमान पाऊलांचा उपयोग केला तर निश्चितच ही पाऊले माणसाच्या प्रगतीसाठी मंगलमय सिद्ध होतील.

**5.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

One of India's greatest musicians was M. S. Subbulakshmi, affectionately known to most people as 'MS'. Her singing brought joy to millions of people not only in all parts of our country, but in other countries around the world as well. In October 1966, MS was invited to sing in the great hall of the General Assembly of the United Nations in New York, while representatives of all the member countries listened. This was one of the greatest honours ever given to any musician. For several hours MS kept that international audience spellbound with the beauty of her voice and her style of singing; when the concert was over, the entire audience stood up and clapped as a sign of their appreciation of not only the singer but of the great music that she had carried with her from an ancient land. India could not have had a better ambassador. MS was the first musician ever to be awarded the 'Bharat Ratna', India's highest civilian honour. She was the first Indian musician to receive the Ramon Magsaysay Award in 1974 with the citation reading "exacting purists acknowledge Shrimati M. S. Subbulakshmi as the leading exponent of classical and semi-classical songs in the Carnatic tradition of South India".

**6.** *(a)* खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* कडू कारलं तुपात तळलं, साखरेत घोळलं तरी कडूच

*(ii)* कशात काय अन् फाटक्यात पाय

*(iii)* उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

(iv) लोटांगण घालणे

(v) फैलावर घेणे

(b) खाली दिलेल्या कल्पनांचा 10 वाक्यात विस्तार करा : 5×2=10

(i) विद्या विनयेन शोभते

(ii) गर्जेल तो पडेल काय

(c) खाली दिलेल्या विषयावर 20 वाक्यांचा संवाद लिहा : 10

ग्रंथ हेच गुरू

(d) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×5=5

(i) परभृत

(ii) शैशव

(iii) शाठ्य

(iv) विकल्प

(v) राऊळ

www.mpscmaterial.com

(e) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1×5=5

(i) मिंधा

(ii) बृहत

(iii) प्रखर

(iv) तमा

(v) चोंबडा

★★★



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial